पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड प्रभाग कार्यालय, राहटणी-17
जा.क्र.डप्रसभा/कावि/ ४१/२०१४
दि. १३/०१/२०१४

प्रति,
मा.----------------------------
सदस्य/सदस्या
ड प्रभाग समिती

विषय - ड प्रभाग समितीची विशेष सभा दिनांक १८/०१/२०१४ रोजी आयोजित केले बाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दि. १८/०१/२०१४ रोजी **सकाळी ११.००** वाजता ड प्रभागाच्या छत्रपती शाहु महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडणेत आलेली आहे. तरी प्रस्तूत सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ड प्रभाग समिति

कार्यपत्रिका क्रमांक ११

दिनांक - १८ /१ /२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दि. १८/०१/२०१४ रोजी **सकाळी ११.००** वाजता ड प्रभागाच्या छत्रपती शाहु महाराज सभागृहात करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

**विषय क्र.१)** महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम २९–अ (१) अन्वये १२ लाख लोकसंख्येपर्यंत ०४ प्रभाग समित्या आणि १२ लाख लोकसंख्येच्या पुढे अतिरीक्त ०३ लाख लोकसंख्येकरीता एक या प्रमाणे प्रभाग समित्यांची रचना करण्याची तरतुद आहे. त्याकरीता महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या विचारात घेऊन पूर्वीच्या अ,ब,क,ड या ०४ प्रभाग समित्यां व्यतिरिक्त नव्याने ०२ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २९ – अ (१) मध्ये प्रत्येक शहरात महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुसार प्रभाग समित्यांची रचना करण्याचे अधिकार मा. महापालिका सभेला आहेत. त्यानुसार मा.महापालिका सभेने ठराव क्र. ३५१ दि. १९/०८/२०१३. अन्वये महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या पुर्वीच्या ०४ प्रभाग समित्यांऐवजी खालील नमुद केल्याप्रमाणे एकूण ०६ प्रभाग समित्यांची त्यांचे कार्यक्षेत्रात समाविष्ट होत असलेले प्रभाग व प्रस्तावित क्षेत्रिय कार्यालयांची ठिकाणे यांसह पुनर्रचना करण्यास मान्यता दिली आहे.

पुनर्रचनेबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | ८,१०,१४,१५,१६,१७, १८,१९,२५,२६,२७ = ११ | भेळ चौक, प्राधिकरण, निगडी, पुणे ४४. |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | २०,२१,२२,२३,२४,४२,४९, ५०,५१,५२,५३ = ११ | एल्प्रो कंपनी आवार लिंकरोड चिंचवड, पुणे ३३. |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | ३७,३८,३९,४०,४१,५८,५९, ६०,६१,६२,६३,६४ = १२ | हॉकी स्टेडीयम शेजारी, नेहरुनगर भोसरी, पुणे ३९. |

| | | | |
|---|---|---|---|
| **४.** | **ड क्षेत्रीय कार्यालय** | **४३,४४,४५,४६,४७,४८, ५४,५५,५६, ५७, = १०** | **औंध रावेत रस्ता, रहाटणी, पुणे १७.** |
| **५.** | **इ क्षेत्रीय कार्यालय** | **६,७,२९,३०,३१,३२,३३,३४, ३५,३६, = १०** | **पांजरपोळ समोर, पुणे नाशिक रस्ता, भोसरी, पुणे ३९** |
| **६.** | **फ क्षेत्रीय कार्यालय** | **१,२,३,४,५,९,११,१२,१३,२८ = १०** | **प्राधिकरणाचे जुने कार्यालय, टिळक चौक, निगडी पुणे ४४** |

त्यानुसार महापालिकेच्या अ,ब,क,ड,इ आणि फ या प्रमाणे समित्यांची पुनर्रचना करुन नविन क्षेत्रीय कार्यालये अस्तित्वात येणे कामी मा.महापालिका सभेने ठराव क्र. ३५१ दि. १९/०८/२०१३ अन्वये मान्यता दिल्यानूसार पूर्वीचे ड प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या उक्त ठरावात नमुद काही प्रभाग वगळून इतर प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ठ केल्याने अथवा पुनर्रचनेनुसार इतर प्रभागातील काही प्रभाग नव्याने समाविष्ट करुन पुनर्रचित ‘इ’ व ‘फ’ प्रभाग समिती अस्तित्वात आलेली असल्याने त्याकरीता क्षेत्रिय कार्यालय प्रत्यक्ष कार्यान्वित करणेकरीता आवश्यक त्या सांविधिक बाबींची/प्रक्रीयांची पूर्तता करुन प्रत्यक्ष कामकाज सुरु करणेबाबत विचार करणे.

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड सप्रभाग समिती

क्र.डप्र/सभा/कावि/४० /२०१४

दि. १३ / १ /२०१४

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.